पुढारी

# शिवाजी विद्यापीठाकडून पीएच.डी. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामार्फत पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले आहेत. २४ जुलैपर्यंत अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. विद्यापीठाने पीएच.डी. प्रवेश २०२२-२३ साठी शुक्रवार (दि. ८) पासून विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांनी www.unishivaji.ac.in अंतर्गत Ph.D.Admission 2022-23 या लिंकवर भेट द्यावी. प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक तसेच हॉल तिकीट लवकरच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी परिपत्रकाद्वारे कळविले आहे.